# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./2871 /२०२२ दि. 16/०७/२०२२

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित**

## परिपत्रक

विषय:- केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयांची नावे समाविष्ट करणेबाबत.

संदर्भ:- मा. सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. विधी-३४२२/प्र.क्र.४०/सीईटीसेल/७६१५ दि. १४/०७/२०२२

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना कळविण्यात येते की, संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन सदर पत्रातील खालील दोन मुद्यांची माहिती दि. १८/०७/२०२२ पर्यंत महाविद्यालयीन विभागाच्या college.section@unigug.ac.in या ई-मेल आय डी वर Excel File मध्येच Kruti Dev ०५५ या Font मध्ये Soft Copy व Hard Copy सह आवश्यक कागदपत्रे जोडून विद्यापीठात सादर करावी.

मुद्दा क्र. १ - महाविद्यालयांचे बाबतीत न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याचे स्वरुप व मा. न्यायालयाचे त्याबाबतचे आदेश.

मुद्दा क्र. २ - शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या बाबतीत राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद,नवी दिल्ली (NCTE) व्दारे काही आक्षेप/त्याची पूर्तता/प्रवेशासंबंधी काही सूचना असल्यास त्याची माहिती.

जी महाविद्यालये उक्त मुद्यांची माहिती सादर करणार नाही अशा महाविद्यालयांची नावे केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये समाविष्ट करण्यासाठी शिक्षण संचालनालय,पुणे यांचेकडे पाठविण्यात येणार नाही,याची नोंद घ्यावी.

सहपत्र:- संलग्नित

मा. प्र-कुलगुरू यांच्या मान्यतेने,

16/7/22

(देवेंद्र एम. झाडे)
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय ,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.

फोन नं. ०२०/२६०५१५१२ Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र. विधी-३४२२/प्र.क्र. ४० /सीईटीसेल/ ७६१५ दिनांक : 14 JUL 2022

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय : केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयांची नावे समाविष्ट करणेबाबत . . .**

उपरोक्त विषयी, विधी ३ वर्ष, विधी ५ वर्ष, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए.बी.एड. / बी.एस्सी.बी.एड. (एकात्मिक ४ वर्षे) आणि बी.एड.-एम.एड. (एकात्मिक ३ वर्षे) अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये आपल्या विद्यापीठाशी सलंग्नित उक्त अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचा समावेश करणेबाबत संचालनालय स्तरावरुन निर्णय घेण्यासाठी सदरहू अभ्यासक्रमास संलग्निकरण / प्रवेश क्षमतेची माहिती आवश्यक आहे. सबब, सोबतच्या तक्त्यामधील माहिती आपल्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह संचालनालयास सादर करावी.

माहिती सादर करतेवेळी पुढील बाबी विचारात घेण्यात याव्यात -

१. महाविद्यालयांचे बाबतीत न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याचे स्वरूप व मा. न्यायालयाचे त्याबाबतचे आदेश यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
२. शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या बाबतीत राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली (NCTE) द्वारे काही आक्षेप/ त्याची पूर्तता / प्रवेशासंबंधी काही सूचना असल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

उपरोक्त नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने आपणाशी संबंधित माहिती law.dhepune@nic.in या ई-मेल आयडीवर तात्काळ पाठविण्यात यावी.

( डॉ. प्रकाश बच्छाव )
सहसंचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ०१

प्रत-

मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिएर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

## तक्ता

अभ्यासक्रमाचे नाव -

१. विधी ३ वर्ष
२. विधी ५ वर्ष
३. बी.एड.
४. एम.एड.
५. बी.पी.एड
६. एम.पी.एड
७. बी.ए.बी.एड. / बी. एस्सी. बी. एड. (एकात्मिक ४ वर्षे)
८. बी.एड.-एम.एड. (एकात्मिक ३ वर्षे)

अभ्यासक्रम : ---------

| अ. क्र. | संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | प्रथम वर्ष प्रवेश क्षमता | प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करावयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता | विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी शिफारस आहे / नाही. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |